Coverage Report: TCS IT Wiz – Mumbai Edition

**Publication:** Loksatta
**Date:** 11/11/2014
**Edition:** Mumbai
**Page No:** 4
**Headline:** IT Quiz Competition

# आयटीविषयक प्रश्नमंजूषा स्पर्धा

**मुंबई** : शाळांमध्ये माहिती तंत्रज्ञान हा विषय शिकविला जातो. या विषयांतील कौशल्ये विकसित करणे, विद्यार्थ्यांमध्ये तंत्रज्ञानाची आवड निर्माण होणे या उद्देशाने टीसीएस या कंपनीतर्फे दरवर्षी राष्ट्रीय पातळीवर एका प्रश्नमंजूषा स्पर्धेचे आयोजन केले जाते. या वर्षीच्या स्पर्धेतील प्राथमिक फेऱ्या सुरू झाल्या असून मुंबई विभागाची प्राथमिक फेरी १६ नोव्हेंबर रोजी पार पडणार आहे. या स्पर्धेत लेखी परीक्षा घेतली जाते. यात विजयी पहिल्या सहा संघांना विभागीय अंतिम फेरीसाठी निवडले जाते. विभागीय अंतिम फेरीतील विजेत्या संघाला डिसेंबरमध्ये महा अंतिमफेरीसाठी पाठविले जाते. मुंबई फेरीत सहभागी होण्यासाठी इच्छुक शाळांनी आपल्या प्रवेशिका १४ नोव्हेंबरपर्यंत टीसीएस हाऊस, रॅव्हेलीन स्ट्रीट, २१ डीएस मार्ग, फोर्ट या पत्त्यावर पाठवाव्यात. इच्छुक शाळांना www.tcsitwiz.com वर नोंदणी करता येईल. विभागीय स्पर्धेतील विजेत्यांना चषक याचबरोबर आयपॅड एअर देऊन गौरविण्यात येणार आहे. अधिक माहितीसाठी संपर्क - ०२२-६७७८९०८०/८१.